उद्योग सहसंचालक गट-अ या
<u>संवर्गाच्या ज्येष्ठतासूचीतील स्थान</u>
<u>निश्चित करण्याबाबत.</u>
श्री.शै.गि.राजपूत, उद्योग सहसंचालक

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
शासन परिपत्रक क्र.ज्येष्ठता-२११८/४६१/प्र.क्र.१०८/उद्योग-३
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
दिनांक : ०८ मार्च, २०१९.

<u>संदर्भ</u> :- १) शासन परिपत्रक क्र.ज्येष्ठता-२११६/प्र.क्र.७०/उद्योग-३, दि.१६.०९.२०१६
२) शासन ज्ञापन क्र.इएसटी-२०१५/६९७/प्र.क्र.१३४/उद्योग-३, दि.१.०६.२०१८
३) शासन परिपत्रक क्र.ज्येष्ठता-२११८/४६१/प्र.क्र.१०८/उद्योग-३, दि.१७.१०.२०१८
४) उद्योग संचालनालयाचे पत्र क्र.उसं/आस्थापना-१/ ज्ये.सू./ उ.स.सं./ सुधा. ज्ये. सू. राजपूत / २०१९/अे-२६७, दि. १४.२.२०१९

<u>प्रस्तावना :-</u>

श्री.शै.गि.राजपूत वि.जा.(अ) यांची उद्योग उपसंचालक (तां) या पदावर दि.१९.१०.१९९७ रोजी नियुक्ती झाली असून जात प्रवर्गानुसार ते दि.१९.०६.२००७ रोजी झालेल्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत, अधिक्षकीय उद्योग अधिकारी गट-अ या पदावर पदोन्नतीसाठी तयार करण्यात आलेल्या निवडसूचीसाठी पात्र ठरल्यामुळे सदर निवडसूचीतील श्री.एच.ओ.गोसावी, भ.ज.(ब) (अ.क्र.५) यांचा पदोन्नतीचा दिनांक श्री.राजपूत, वि.जा.(अ) यांना अधीक्षकीय उद्योग अधिकारी पदावरील पदोन्नतीचा मानीव दिनांक म्हणून शासन ज्ञापन दि.१३.०७.२०१५ अन्वये मंजूर करण्यात आला असून त्यानुषंगाने अधिक्षकीय उद्योग अधिकारी या संवर्गाच्या ज्येष्ठतासूच्या संदर्भ क्र.१ च्या परिपत्रकान्वये सुधारित करण्यात आल्या आहेत. तसेच, श्री. राजपूत यांना त्यांना सेवाकनिष्ठ असलेल्या श्री.वि.ल.राजाळे, उद्योग सह संचालक यांचा पदोन्नतीचा (प्रत्यक्षात रुजू) दि.१७.०६.२०१४ हा मानीव दिनांक संदर्भाधीन क्र.२ च्या ज्ञापनान्वये अनुज्ञेय करण्यात आला आहे. त्यानुषंगाने संदर्भ क्र.३ च्या परिपत्रकान्वये उद्योग सहसंचालक गट-अ या संवर्गाच्या दि.१.०१.२०१५, १.०१.२०१६, १.०१.२०१७ व १.०१.२०१८ च्या ज्येष्ठतासूचींमध्ये श्री.राजपूत यांचे स्थान निश्चित करण्यात आले असून सर्व संबधितांचे आक्षेप उद्योग संचालनालयामार्फत सादर करण्यास कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने उद्योग संचालनालयाने त्यांच्या संदर्भ क्र. ४ च्या पत्रान्वये प्राप्त झालेल्या आक्षेपांवर अभिप्राय देऊन सदर ज्येष्ठतासूची अंतिम करण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर केला आहे. त्याअनुषंगाने सदर ज्येष्ठतासूची अंतिम करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रक :-

उद्योग संचालनालयाच्या आस्थापनेवरील उद्योग सहसंचालक गट-अ या संवर्गातील दि.१.०१.२०१५, १.०१.२०१६, १.०१.२०१७, व १.०१.२०१८ च्या ज्येष्ठतासूचींतील श्री.शै.गि.राजपूत यांच्या ज्येष्ठतेत बदल होत असून त्यांचे स्थान निश्चित करण्याबाबत संदर्भ क्र.३ चे परिपत्रक प्रसिध्द करण्यात आले. सदर परिपत्रकाच्या अनुषंगाने सर्वश्री. राजाळे व जोशी या अधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेल्या अभिवेदनांची पडताळणी केल्यानंतर श्री.शै.गि.राजपूत वि.जा.(अ) यांच्या स्थाननिश्चितीमध्ये काही बदल होत नसल्याने श्री.शै.गि.राजपूत वि.जा.(अ) यांची उद्योग सहसंचालक गट-अ संवर्गाच्या उक्त कालावधीतील ज्येष्ठतासूचींमध्ये स्थाननिश्चिती संदर्भ क्र.२ च्या ज्ञापनातील अटींच्या अधीनराहून खाली नमूद केल्याप्रमाणे अंतिम करण्यात येत आहे.

नाव व विभाग	जात प्रवर्ग	जन्म तारीख	नियुक्ती दिनांक	उद्योग सहसंचालक पदावर प्रत्यक्ष नियुक्तीचा मार्ग व दिनांक	ज्येष्ठता दिनांक
श्री.शै.गि. राजपूत, उद्योग संचालनालय, मुंबई	वि.जा. (अ)	१.०६.१९६७	१४.१०.१९९७ (उद्योग उपसंचालक (तां) या पदावर)	पदोन्नतीने दिनांक २६.०८.२०१५	**१७.०६.२०१४** शासन ज्ञापन दि.१.०६.२०१८ अन्वये श्री.राजाळे यांच्या पदोन्नतीचा दिनांक हा मानीव दिनांक म्हणून मंजूर

उद्योग सहसंचालक गट-अ या संवर्गाच्या ज्येष्ठतायादीतील श्री.शै.गि.राजपूत यांचे स्थान निश्चित करण्याबाबत

अ. क्र.	ज्येष्ठता यादी वर्ष	ज्येष्ठता यादी परिपत्रक क्रमांक	परिपत्रकाचा दिनांक	ज्येष्ठता यादीतील अ.क्र.	ज्येष्ठता यादीतील सुधारीत अ.क्र.	ज्येष्ठता यादीतील क्रम (पूर्वी)	ज्येष्ठता यादीतील क्रम (नंतर)
१	१.१.२०१५	ज्येष्ठता-२११५/२८८/ प्र.क्र.३७/ उद्योग-३	१६.०५.२०१५	ज्येष्ठता सूचीत नावाचा समावेश नाही	१० अ	९. श्री.जैन १०. श्री.दाबेराव ११. श्री.राजाळे १२. श्री.पाटील	९. श्री.जैन १०. श्री.दाबेराव **१०अ. श्री.राजपूत** ११. श्री.राजाळे १२. श्री.पाटील
२	१.१.२०१६	ज्येष्ठता-२११६/१०४/ प्र.क्र.१९/ उद्योग-३ शुध्दीपत्रक क्र.ज्येष्ठता-२११६/१०४/ प्र.क्र.१९/ उद्योग-३	१२.०४.२०१६ २६.०४.२०१६	८	३ अ	२. श्री.जैन ३. श्री.दाबेराव ४. श्री.राजाळे ५. श्री.पाटील ६. श्री.देशमुख ७. श्री.सुरवसे ८. श्री.राजपूत	२. श्री.जैन ३. श्री.दाबेराव **३अ. श्री.राजपूत** ४. श्री.राजाळे ५. श्री.पाटील
३	१.१. २०१७	ज्येष्ठता-२११७/८१/ प्र.क्र.६/ उद्योग-३ शुध्दीपत्रक क्र.ज्येष्ठता-२११७/८१/ प्र.क्र.६/ उद्योग-३	२६.०७.२०१७ १५.०३.२०१८	८	३ अ	२. श्री.जैन ३. श्री.दाबेराव ४. श्री.राजाळे ५. श्री.पाटील ६. श्री.देशमुख ७. श्री.सुरवसे ८. श्री.राजपूत	२. श्री.जैन ३. श्री.दाबेराव **३अ. श्री.राजपूत** ४. श्री.राजाळे ५. श्री.पाटील
४	१.१.२०१८	ज्येष्ठता-२११८/४८/ प्र.क्र.२८/ उद्योग-३	४.०४.२०१८	८	३ अ	२. श्री.जैन ३. श्री.दाबेराव ४. श्री.राजाळे ५. श्री.पाटील ६. श्री.देशमुख ७. श्री.सुरवसे ८. श्री.राजपूत	२. श्री.जैन ३. श्री.दाबेराव **३अ. श्री.राजपूत** ४. श्री.राजाळे ५. श्री.पाटील

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेताक २०१९०३०८१४१२४८१४१० असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

Namdeo Kondiba Bhosale

Digitally signed by Namdeo Kondiba Bhosale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8db1ca2341132b954db9052b5ef3bd93e7410456a96fa70df7ff81c68231fcd3, serialNumber=8c6a286229ecc7982a08553f49d547ef64be25c7f26fc96324ece7cccbfeb8c5, cn=Namdeo Kondiba Bhosale
Date: 2019.03.13 12:36:27 +05'30'

(डॉ.ना.कों.भोसले)
शासनाचे उप सचिव

प्रति,

१. विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई यांना विनंती करण्यात येते की, सदरहू परिपत्रक आपल्या कार्यालयातील सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावे.

२. संबंधित अधिकारी (द्वारा-विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई)

३. निवडनस्ती (उद्योग-३)